# प्रेस नोट

## पुण्यातील २ सनसनाटी दरोडयातील मुद्देमाल हस्तगत

सन २०१४ मध्ये पुणे शहरामध्ये कोरेगाव पार्क परिसरात असलेल्या पी एम जी ॲन्ड ज्वेलर्स कोरेगाव पार्क या ज्वेलरीच्या दुकानावर ३ अनोळखी इसम व १ महिला यांनी दागीने घेण्याचे बहाण्याने दरोडा टाकुन, दुकानातील कामगार यांना पिस्तुलाचा धाक दाखवुन १,४२,००००/- रूपये (एक कोटी बेचाळीस लाख रुपये ) हि-याचे दागिने जबरदस्तीने चोरून नेलेले होते, त्याबाबत कोरगाव पार्क पोलीस स्टेशन येथे गु र न १३३/१४ भा द वि क ३९५,३९७,३५२,४२७,३४ आर्म ॲक्ट ३(२५) प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आलेला होता.

तसेच हडपसर येथे सोनीगरा ज्वेलर्स या दुकानावर ३ अनोळखी इसम यांनी दागीने घेण्याचे बहाण्याने दरोडा टाकुन, दुकानातील कामगार यांना पिस्तुलाचा धाक दाखवुन १४५० ग्रॅम किंमत रूपये ४०,०००००/- रूपये (चाळीस लाख रूपये ) सोन्याचे दागिने जबरदस्तीने चोरून नेलेले होते, त्याबाबत हडपसर पोलीस स्टेशन येथे गु र न ५८३/१४ भा द वि क ३९२,३४ आर्म ॲक्ट ३(२५) प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आलेला होता.

सदर दाखल गुन्हयात गुन्हे शाखा, युनिट २ यांनी आरोपी (१) अजय चद्रकांत त्रिपाठी वय ३४ वर्ष रा.मारुती शोरुम जवळ वडकी पुणे मुळ गाव बीरमउ मु.पो रका, तहसिल पटटी जिल्हा प्रतापगढ राज्य उत्तरप्रदेश (२) गौरीशंकर दिनेशकुमार त्रिपाठी वय ३० वर्ष रा.साईनाथनगर साईबाबा मदिराजवळ वडगाव शेरी पुणे मुळ गाव – ग्राम उचौली पोस्ट अमतामउ ता.मित्री थाना –मित्री जिल्हा – सितापुर उत्तरप्रदेश यांना अटक करुन सदर आरोपींची पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली होती. सदर पोलीस कस्टडी मध्ये युनिट २ कडील तपासी अंमलदार अन्सार शेख व स्टाफ आरोपीसह प्रतापगड, मिस्त्री, सितापूर, लखनऊ, उत्तरप्रदेश येथे जावून आरोपी क्र. १ अजय चद्रकांत त्रिपाठी याचे चोरी करुन वाटणीस आलेले सोनेजडीत डायमंडचे नेकलेस व कानातील रिंगा किंमत रुपये १,०५,०००/- हे कोरेगाव पार्क पो.स्टे. गुन्हयात व आरोपी क्र. २ गौरीशंकर दिनेशकुमार त्रिपाठी याचे चोरी करुन वाटणीस आलेले सोन्याचे नेकलेस व एक लहान चेन किंमत रुपये ८९,०००/- हे हडपसर पो.स्टे. चे गुन्हयात जप्त करण्यात आले असून एकूण १,९४,०००/- रुपयेचे दागिने स्थानिक पोलीसांचे मदतीने सोनाराकडून पंचनाम्याने जप्त केले आहे.

यापूर्वी कोरेगांव पार्क पोलीस स्टेशन गु र न १३३/१४ भा द वि क ३९५,३९७,३५२,४२७,३४ आर्म ॲक्ट ३(२५) या गुन्हयातील ७,५०,०००/- रूपयांचे हि-याचे व सोन्याचे दागीने हस्तगत करण्यात गुन्हे शाखेला यश आलेले आहे. तसेच आरोपी अविनाश चंद्र श्रीकृष्ण त्रिपाठी यांची पत्नी स्वातीसिंग यादव हिने स्वतःचे नावाने मणीपुरम गोल्ड येथे १६८.६ सोन्याचे दागीने किंमत रूपये ३,१४,०००/- तारण ठेवुन त्यावर कर्ज घेतले असुन सदरचे सोने फ्रीज करण्यात आलेले असून दाखल गुन्हयात आज पावेतो १२,५८,०००/- रुपये चे सोन्याचे व हिऱ्यांचे दागिने जप्त करण्यात आलेले आहेत.

सदरची कामगिरी अपर पोलीस आयुक्त प्रदिप देशपांडे, पोलीस उप आयुक्त, पंकज डहाणे, यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस आयुक्त समीर शेख, पोलीस निरीक्षक सतिश निकम, पोलीस निरीक्षक राम राजमाने, सहा पोलीस निरीक्षक अन्सार शेख, सपोफौ राजकुमार तांबे, पोहवा, दिशेन गडांकुश, सिराज शेख, राजु केदारी, किशोर वग्गु, चंद्रकांत महाजन यांनी केलेली आहे.